स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.**

फोन नं.०२०- २६१२२०७६ Email ID: ddtpho_pune@rediffmail.com

## कार्यालयीन आदेश

**विषय :** गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड कर्मचारी यांचे वयाच्या ५०/५५ व्या वर्षापलिकडे / अर्हताकारी सेवेच्या ३० वर्षानंतर सेवा पुनर्विलोकनाकरिता सेवा पुनर्विलोकन समिती पुर्नगठित करणेबाबत...

**संदर्भ :** १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एलपीएल-२०१७/ प्र.क्र.२१ / का.पंधरा, दिनांक १० जून, २०१९.

२) मुख्य कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र. आस्था/ ५०-५५ आढावा/ प्रशा-१/ ३७७४, दि.१४.१२.२०२०.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ च्या नियम १०(४) व नियम ६५ अनुसार सार्वजनिक हितास्तव अकार्यक्षम व संशयास्पद सचोटीच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना, वयाच्या ५०/५५ व्या वर्षी अथवा ३० वर्षे अर्हताकारी सेवा यापैकी जे अगोदर घडेल त्यावेळी, त्यांचे सेवा पुनर्विलोकन करुन त्यांना शासन सेवेतून मुदतपुर्व सेवानिवृत्त करावे असे शासनाचे धोरण आहे. या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भित शासन निर्णयानुसार एकत्रित कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. या अन्वये, गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड कर्मचारी यांचे वयाच्या ५०/५५ व्या वर्षापलिकडे / अर्हताकारी सेवेच्या ३० वर्षानंतर सेवा पुनर्विलोकनाकरिता मुख्य कार्यालयाचे संदर्भ क्र. ०२ येथील आदेशान्वये समिती गठित करण्यात आली असून सदर समितीचे प्रशासकीय कारणास्तव पुर्नगठन करणे आवश्यक असून त्यास अनुसरून गट-ब (अराजपत्रित) मधील स्वीय सहायक, उच्चश्रेणी लघुलेखक, निम्न श्रेणी लघुलेखक, अधीक्षक व प्रमुख आरेखक तसेच गट-क मधील प्रथम लिपिक, वरिष्ठ लिपिक, सहायक आरेखक व कनिष्ठ आरेखक या संवर्गाकरिता संचालनालयाच्या स्तरावर सेवा पुनर्विलोकन समिती पुर्नगठित करण्याबाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**आदेश**

विभागप्रमुखांना पुनर्विलोकन विषयक सल्ला देण्यासाठी तसेच अधिकारी / कर्मचारी यांच्या पात्रापात्रतेबाबतच्या शिफारशी विभागप्रमुखांना अंतिम निर्णयासाठी सादर करणेकरिता, संचालनालयाच्या स्तरावरील समिती खालीलप्रमाणे पुर्नगठित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | सहसंचालक, नगर रचना,<br>पुणे विभाग, पुणे | अध्यक्ष |
| २) | उपसंचालक, नगर रचना,<br>मुख्य कार्यालय, पुणे | सदस्य |
| ३) | उपसंचालक, नगर रचना,<br>वाहतुक व परिवहन, पुणे. | सदस्य |
| ४) | प्रशासन अधिकारी<br>मुख्य कार्यालय, पुणे | सदस्य सचिव |

०२. वरील समितीचे कामकाज शासनाने पुनर्विलोकनाबाबत विहित केलेल्या निकषांनुसार राहील.

०३. सदर आदेश नगर रचना संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावेत.

**(मुळ मसुदा मा.संचालकांनी मंजूर केला असे)**
जा.क्र. आस्था/५०-५५ आढावा/प्रशा-१/ ५६८२
दिनांक 29 नोव्हेंबर, २०२२.

29/11/2022

(वि.ल.वाघमोडे)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता.

**प्रत**, मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग (नवि-२७) मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर...

**प्रत, माहिती व पुढील कार्यवाहीसाठी...**

१) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग / कोकण विभाग / नाशिक विभाग / नागपूर विभाग/ अमरावती विभाग / औरंगाबाद विभाग / अंमलबजावणी कक्ष, पुणे / मुल्यांकन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) उपसंचालक, नगर रचना, मुख्य कार्यालय, पुणे / नागरी संशोधन घटक, पुणे / वाहतुक व परिवहन, पुणे

३) प्रशासन अधिकारी, मुख्य कार्यालय, पुणे

४) कार्यासन अधिकारी, प्रशा-१ अ/ प्रशा-१ब / प्रशा-२/ लेखा / अर्थसंकल्प / अभिलेख

५) श्री.------------------------------ यांनी प्रस्तुत आदेश नगर रचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावेत.